# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना प्रमुख जिल्हा मार्ग- ८४, खडकी ते भवानी नगर या रस्त्याच्या कामाकरीता शेटफळगढे ता. इंदापूर, जि.पुणे येथील ०.९४ हे. राखीव वनजमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-१७/Nodal/Pune/ID-१३०१४ (२४) /१५३७/२०२२-२३, नागपूर, दिनांक २०.०९.२०२२.

संदर्भाधीन दिनांक २०.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रमुख जिल्हा मार्ग- ८४, खडकी ते भवानी नगर ( कि.मी. ०/००० ते कि.मी. ३०/३००) या रस्त्याच्या कामाकरीता शेटफळगढे ता. इंदापूर, जि.पुणे येथील ०.९४ हे. राखीव वनजमीन वळतेकरणाबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती शासनास उपलब्ध करुन द्यावी.

(१) प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे शेटफळगढे येथील गट नं. ६६, येथील क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यावर खाजगी हक्कधारकांची नावे आहेत. सबब, खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

(२) प्रकल्पासाठी प्रस्तावित क्षेत्र तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रांची KML File सादर करावी.

(३) अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी, पुणे यांचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र सादर करावे.

(४) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीचा ७/१२ उतारा सादर करावा.

(५) प्रकल्प यंत्रणेचा ऑनलाईन पार्ट-१ अर्ज सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.

२) उपवनसंरक्षक, पुणे.

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे